पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अमरावती ■ वर्ष १ ■ अंक १० ■ गुरुवार, दि. ४ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/26/A2977 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# भूमि अभिलेख विभागातील गैरव्यवहाराचा पर्दाफाश

## निलंबित उपअधीक्षक पंकज पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

RRC News सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

प्रतिनिधी ४ जून

**अकोला:** अकोला भूमी अभिलेख कार्यालयातील तत्कालीन आणि सध्या निलंबित असलेले उपअधीक्षक पंकज शिवदास पवार यांच्याविरुद्ध प्रशासकीय अधिकारांचा गैरवापर, फसवणूक आणि शासकीय दप्तरात मोठ्या प्रमाणावर फेरफार केल्याप्रकरणी अखेर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण, या सर्व प्रकरणात तोंडी आदेश देणारे आणि चौकशी समितीत सदस्य असणाऱ्यांना या सर्व प्रकरणात वगळण्यात आले आहे. इतकेच नाही तर ज्या विविध प्रकरणात विभागीय चौकशी सुरु आहे. त्याच प्रकरणात फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणे हे कितपत न्यायोचित आहे असा ही प्रश्न विचारला जात आहे. या सर्व प्रकरणात तपास अधिकाऱ्यांना अद्याप चौकशी समितीचा पुर्ण अहवाल का दिला नाही अशी विचारणा होत आहे. त्याच बरोबर केवळ उपअधिक्षक पंकज पवार हेच कसे काय गुन्हेगार ठरले. लाभार्थ्यांच्या



बरोबर, विभागातील एजंट आणि विभागातील त्यांच्या कनिष्ठांनी जो अहवाल विविध प्रकरणात दिला त्यानंतर त्यांनी मान्यता दिली. इतकेच नाही तर केवळ उपअधिक्षक यांच्या मान्यतेने प्रकरण पुर्णत्वास गेले नाही काही प्रकरणात वरिष्ठांनी सरकारी पोर्टलवर से दिल्यानंतरच प्रकरणे मार्गी लागली असे असताना केवळ एकटा पंकज पवार याला दोषी ठरवित इतर आरोपींना वगळण्याचा उद्योग केला कोणी असा प्रश्न उपस्थित होत आहे. निलंबित उपअधिक्षक पंकज पवार यांच्या १ जून २०२३ ते ३० जून २०२५ या कार्यकाळातील कामकाजाची सखोल चौकशी करण्यात आली होती. अमरावती प्रदेशचे भूमी अभिलेख उपसंचालक आणि पुणे जमाबंदी आयुक्तांच्या




मार्गदर्शनाखाली झालेल्या या चौकशीचा अहवाल २ जानेवारी २०२६ रोजी सादर करण्यात आला होता. या अहवालात पवार यांनी पदाचा गैरवापर करून गंभीर गैरव्यवहार केल्याचे निष्पन्न झाले आहे.

या सर्व गंभीर बाबींचा विचार करून भूमी अभिलेख अमरावती उपसंचालकांच्या निर्देशानुसार, अकोल्याच्या जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख भारती खंडेलवाल यांनी सिटी कोतवाली पोलिसात तक्रार दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, या रॅकेटमध्ये महसूल विभागातील आणखी काही अधिकाऱ्यांचा किंवा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

### चौकशीत समोर आलेले गंभीर गैरप्रकार

- पवार यांनी शासकीय सेवेत असताना शासनाचा विश्वासघात करून खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी अनेक बेकायदेशीर कृत्ये केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात नेमके खाजगी व्यक्ती कोण त्यांचा तपशील मात्र जाहिर करण्यात आला नाही.
- तब्बल १५ प्रकरणांमध्ये मालमत्तेचे अधिकार, सत्ता प्रकार बदलणे आणि मयत खातेदारांच्या नावे नियमबाह्य पद्धतीने अर्ज मंजूर करणे. यातील संबंधित मालमत्ताधारक कोण, त्यांचे एजंट कोण, त्यांचे प्रकरणे कुठल्या ज्युनिअर आणि सिनिअरने मंजुर केले.
- ७ प्रकरणांमध्ये तात्पुरत्या भाडेपट्ट्याच्या मिळकत पत्रिका तयार करणे, तसेच केवळ जागेची पाहणी करून नवीन मिळकत पत्रिका नियमबाह्यपणे बनवणे. यातील लाभार्थी कोण अशी विचारणा आता सुरु झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावर शासकीय कागदपत्र बनावट केल्याचा गुन्हा का दाखल नाही.
- खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी मालमत्तेचे क्षेत्र वाढवणे, सार्वजनिक सुविधांच्या जागांवर खाजगी व्यक्तींची नावे नोंदवणे आणि जमिनींचे एकत्रिकरण (सामिलीकरण) करताना क्षेत्रफळ वाढवणे. हा उद्योग कोणासाठी केला आणि त्याच्या नावाचा उल्लेख का नाही अशी विचारणा केली जात आहे.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ चे उल्लंघन करून अधिकाराबाहेर जाऊन आदेश देणे आणि प्रमाणपत्रे वाटणे. असे करताना ज्या लाभार्थ्यांसाठी हा सरकारी दस्त बदलण्यात आला त्याच्या विरोधात गुन्हा दाखल होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.
- अकोला महानगरपालिकेकडे भूसंपादनाद्वारे हस्तांतरित झालेल्या शासकीय जागेवर खाजगी व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे चढवणे. हा खाजगी व्यक्ती कोण ज्याच्या नावावर शासकीय जागेचा भाग दिला गेला. त्यांच्या विरोधात गुन्हा का दाखल केला गेला नाही. अशी विचारणा होत आहे.

# कौलखेड स्कूल ऑफ स्कॉलर्सची लिज तर कधीची संपली

**▶▶ अकोला महापालिकेचा भोंगळ कारभार आला समोर ▶▶ मनसे नेत्यांनी जमीन मोकळी करण्याची केली मागणी**




प्रतिनिधी ४ जून

**अकोला:** कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्सची लीज तर करारानंतर आठ वर्षात संपली आहे. तरी देखील महापालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्याकडे का लक्ष दिले नाही असा प्रश्न मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी केला आहे. स्थानिक नागरिकांच्या हक्काची ओपन स्पेस त्यांना त्वरीत खुली करुन देण्याची मागणी मनसेने केली आहे.

कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्स ही ओपन स्पेस मध्ये बांधल्या गेली आहे. ओपन स्पेस मध्ये बांधकाम करताना महापालिकेसोबत झालेल्या करारानुसार केवळ दहा टक्के बांधकामाची परवानगी अपेक्षित आहे. पण, ग्रीन झोन ची जागा ताब्यात ठेवत दहा टक्के पेक्षा अधिकचे बांधकाम स्कुल ऑफ स्कॉलर्सने केल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. ओपन स्पेस स्थानिकांसाठी खुली न ठेवता ती कपाउंडवॉल घेत बंदिस्त केल्या गेली. इतकेच नाही तर शाळेचे चौकीदार स्थानिकांना हाकलून लावत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली. स्कुल ऑफ स्कॉलर्स ने ओपन स्पेस त्वरीत स्थानिकांसाठी खुली करावी अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी केली आहे.

दरम्यान, या विषयावर महापालिकेच्या नगर रचनाकार साबळे यांनी देखील कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्सच्या जागेविषयी असा धक्कादायक खुलासा केला आहे. त्यांनी देखील या विषयी माहिती देताना केवळ आठ वर्ष काही महिन्यांसाठी ही जागा लिजवर दिली होती. त्यानंतर नाही. त्यामुळे महापालिकेच्या कुठले अधिकारी या फाईलवर बसले होते. त्यांनी स्कुल ऑफ स्कॉलर्सची ओपन स्पेस स्थानिकांसाठी खुली का केली नाही अशी विचारणा आता सुरु झाली आहे. तर महापालिकेने नुकत्याच घेतलेल्या ठरावानुसार स्कुल ऑफ स्कॉलर्सची ओपन स्पेस स्थानिकांना सत्तारुढ भाजप मिळवून देईल काय अशी विचारणा होत आहे. दरम्यान, स्कुल ऑफ स्कॉलर्स व्यवस्थापन, मुख्याध्यापक यांच्याशी आम्ही संपर्क केला असता तो झाला नाही. तर त्यांच्या चौकीदाराने आमच्या प्रतिनिधींना आत सोडलेच नाही.

### कौलखेड स्कूल ऑफ स्कॉलर्सचा भाडेपट्टा संपला

▶▶ मौजा कौलखेड मंजूर अभिन्यासात खुली जागा २३४१ स्वे.मी होती. त्यापैकी खुल्या जागेपैकी १-टक्के जागा म्हणजे २४३ स्वे.मी ही जागा स्वर्गीय राधिकाबाई मेघे महिला शिक्षण संस्था तर्फे सचिव श्रीमती सुमिती राजेंद्र वानखडे यांना दिनांक २३ फेब्रुवारी २००६ रोजी ८ वर्ष ११ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने दिली होती. त्यानंतरची जी काही कारवाई करायची होती, एकतर भाडेपट्टा वाढवण्याच्या संदर्भात किंवा खाली करण्यासंदर्भात, त्या संदर्भातली कारवाई महापालिकेकडून प्रलंबित आहे. सदर कारवाई महापालिकेतर्फे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर जागा ही कोणत्या परिस्थितीत संबंधितांना भाडेपट्ट्यावर दिलेली आहे, याचं सखोल प्रत्यक्षरीत्या स्थळ पाहणी करून, नेमकं भाडेपट्ट्यावर देण्यात आल्यानंतर किती बांधकाम जास्त केलं, किती कालावधी जास्त हे केला आणि कोणत्या वापरासाठी त्यांनी व्हायलेशन केलं, याबाबीची सविस्तर तपासणी करून पुढील कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

**साबळे नगर रचनाकार**, महापालिका अकोला.

### स्कूल ऑफ स्कॉलर्स खाली करु



▶▶ कौलखेड येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स एखाद्या खुल्या जागेवर १० टक्के पेक्षा जास्त बांधकाम केले गेले असेल, तर ती जागा सध्याच्या कब्जेदारकाकडून परत ताब्यात घेतली जाईल व पाडण्यात येईल. ताब्यात ओपन स्पेस देखभाल आणि दुरुस्तीसाठी त्याच परिसरातील स्थानिक नागरिकांच्या स्वाधीन केली जाईल. खुल्या जागांवर ज्यांनी बेकायदेशीरपणे ताबा मिळवला आहे, त्यांच्यावर कडक कारवाई करून त्या जागा खाली करून घेतल्या जातील.

**विजय अग्रवाल**
सभापती, स्थायी समिती मनपा, अकोला.

# मराठा आरक्षण : शासकीय यंत्रणा लागली कामाला, हेल्पलाइन नंबरही जारी

प्रतिनिधी ४ जून

**मुंबई :** मराठा आरक्षणासंदर्भात विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार असून, आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदीबाबत नागरिकांना साह्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे. प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातील कार्यालयात ९३२६५६२८१५ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू केला असून, कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल, अशी माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नुकतीच झाली. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटन मंत्री शंभुराज देसाई आदी उपस्थित होते. 'मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात दिलेल्या आश्वासनांची निर्धारित वेळेत पूर्तता करण्यासाठी सर्व विभागांनी प्रशासकीय स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरू करावी. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलतेने निर्णय होण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी गांभिर्याने काम करावे. शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी, शिंदे समितीच्या स्थापनेनंतर १३ लाख दाखल्यांचे झालेले वितरण; तसेच समिती स्थापन होण्यापूर्वी कुणबी प्रमाणपत्राचे झालेले वाटप याची माहिती जिल्हा आणि तालुका स्तरावर तातडीने संकलित करावी.

# ग्रा.पं. चा 'माझे गाव आरोग्य संपन्न गाय' अभियानात सहभाग

**अमरावती :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यग गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याची सुद्ध आरोग्याकडे यशस्वी वाटचाल सुरू झाली आहे. जिल्ह्यात सध्या 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' हे अभियान प्रभावीपणे राबविले जात असून, जिल्ह्यातील एकूण ८४० ग्रामपंचायतींपैकी सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात शंभर टक्के सहभाग नोंदविला आहे. संपूर्ण जिल्हा आता स्वच्छता आणि आरोग्याकडे विशेष लक्ष देत असून, ग्रामीण भागात या निमित्ताने एक नवीन उत्साह निर्माण झाला आहे.

या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्व ग्रामपंचायती आणि स्थानिक आरोग्य संस्थांमध्ये आरोग्यविषयक विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. अभियानांतर्गत केलेल्या उत्कृष्ट कार्यवाहीच्या जोरावर 'सुदृढ विजेता' म्हणून घोषित होण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींमध्ये आता एक निरोगी स्पर्धा सुरू झाली आहे. गावागावात स्वच्छता आणि आरोग्य सुविधा बळकट करण्यावर भर दिला जात आहे.

# मान्सून केरळमध्ये दाखल!

वृत्तसंस्था ४ जून

**तिरूअनंतपुरम :** केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली. पुढील ४८ तासांत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, विदर्भातील मान्सूनसाठी १५ जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते.

पुढील २-३ दिवसात मोसमी वारे महाराष्ट्रातील काही भाग व्यापू शकतात, अशी भारतीय हवामान विभागाची माहिती आहे. पुढील २-३ दिवसांत गोवा, महाराष्ट्राचा काही भाग, सोबतच तामिळनाडू, कर्नाटक, बंगालचा उपसागराचा काही भाग आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती आहे. मान्सून केरळात १ जून रोजी दाखल होत असतो, मात्र यंदा तो ३ जून रोजी दाखल झाला आहे. याचदरम्यान, हवामान विभागाचे तज्ज्ञ प्रवीण कुमार यांनी महत्वाची माहिती दिली आहे. केरळमध्ये मान्सून धडकला असून यंदा तीन दिवस उशिराने आला आहे.

### पुढील ४८ तासांत कोकणात पाऊस

विदर्भात तापमान ४० ते ४२ अंशाचा घरात राहील. १० जून नंतर तापमान कमी होईल. केरळला सामान्यतः एक जूनच्या सुमारास दाखल होतो. आता तीन दिवस उशिरा केरळमध्ये दाखल झाला आहे. पुढील ४८ तासांत दक्षिण महाराष्ट्र त्यामध्ये कोकण मधला भाग तिथे पावसाचा अंदाज आहे, असं प्रवीण कुमार यांनी सांगितले.

### विदर्भात वादळीवाऱ्याचा मध्यम स्वरूपाचा पाऊस

मान्सूनच्या अनुषंगाने परिस्थिती अनुकूल आहे. विदर्भात साधारणतः १५ जूनच्या सुमारास मान्सून दाखल होतो. विदर्भात पुढील काही दिवस वादळीवाऱ्याचा मध्यमस्वरूपाचा पाऊस होईल. मात्र आता येणारा पाऊस हा अवकाळीच असेल, कारण मान्सूनच्या अनुषंगाने अजून विदर्भात अनुकुल वातावरण निर्माण व्हायचे आहे.

# वाघिणीला नव्हे तर तिच्या शावकाला परतवाडा येथे हलविले; वन विभागाचे स्पष्टीकरण

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती :** सिंदेवाही परिक्षेत्र (ब्रह्मपुरी प्रादेशिक वनविभाग) येथील 'टी२' नामांकित वाघिणीच्या शावकासंदर्भात काही वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली माहिती वस्तुस्थितीला धरून नसून दिशाभूल करणारी आहे. या चुकीच्या बातम्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये अनावश्यक भीतीचे आणि वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत गैरसमजाचे वातावरण निर्माण होत असल्याचे वन विभागाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे



याबाबतची खरी वस्तुस्थिती अशी की, सिंदेवाही परिक्षेत्रातील २ वाघीण मानव-वन्यजीव संघर्ष निर्माण करत जराल्यामुळे, वन विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून तिला तिच्या शावकांराह सुरक्षितपणे पकडले आहे. मात्र, वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याप्रमाणे 'टी२' वाघिणीला परतवाडा येथे हलवलेले नसून, तिच्या शावकांपैकी एका शावकाला आवश्यक व्यवस्थापन, सुरक्षितता आणि वैद्यकीय देखरेखीच्या दृष्टीने परतवाडा ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

या शावकाला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सोडण्यात येणार असल्याच्या अफवा देखील पसरत आहेत, परंतु सद्यस्थितीत या 'टी२ कब १' शावकारा मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये सोडण्याचा किंवा मुक्त अधिवासात पुनर्स्थापित करण्याचा कोणताही निर्णय अथवा योजना वन विभागाच्या विचाराधीन नाही शावकाला केवळ सुरक्षित वातावरणात वैद्यकीय देखरेख आणि आवश्यक निमा उपलब्ध करून देणे हाच या स्थलांतराचा प्रमुख उद्देश आहे. प्रसारमाध्यमांनी नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही पासाठी वस्तुस्थितीवर आधारित आणि वन विभागाकडून पडताळणी केलेली अचूक माहिती प्रसारित करावी, असे आवाहन वन विभागातर्फे करण्यात आले आहे.

# सेंट्रल बैंक ऑफ इंडियातर्फे ६ जूनला जिल्ह्यात 'मेगा कृषी क्रेडिट आउटरीच कॅम्प'

**अमरावती :** शेतकरी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित व्यावसायिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सेंटल बैंक ऑफ इंडियाच्या वतीने शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी अमरावती जिल्ह्यात भव्य 'मेगा कृषी ऋण आउटरीच कॅम्प'चे आयोजन करण्यात आले आहे. दर्यापूर येथील माहेश्वरी भवन येथे सकाळी ११ वाजता या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक निकेतन कदम उपस्थित राहणार असून सेंट्रल बैंक ऑफ इंडियाच्या केंद्रीय कार्यालयाचे उपमहाप्रबंधक सचिन सुधाकर, अमरावतीचे क्षेत्रीय प्रमुख सुनील पाण्डेय उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

हा कॅम्प केवळ एकाच ठिकाणी मर्यादित नसून अमरावती जिल्ह्यातील सेंट्रल बैंक ऑफ इंडियाच्या सर्व ४५ शाखांमध्ये एकाच वेळी आयोजित केला जाणार आहे, हे या उपक्रमाचे वैशिष्टय आहे. या गेळाव्यामध्ये शेती आणि पूरक व्यवसायांना गती देणाऱ्या गहत्त्वाच्या योजनांची माहिती दिली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने किसान क्रेडिट कार्ड, कृषी पायाभूत सुविधा निभी, ग्रामीण गोदाम भंडारण, कोल्ड स्टोरेज (शीतगृह) आणि महिला बचत गट यांसारख्या शासकीय व बैंक योजनांचा समावेश आहे. या कॅम्पमध्ये पात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची छाननी करून जागेवरच मंजूरी पत्र आणि थेट कर्जवाटप केले जाणार आहे.

हा कृषी मेळावा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आणि शेतीशी संबंधित व्यवसाय करणाऱ्यांसाठी विशेष संधी निर्माण करणारा आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवानी आणि कृषी उद्योजकांनी शनिवार, दि. ६ जून रोजी आपल्या जवळच्या सेंट्रल बैंक ऑफ इंडियाच्या शाखेत किंवा दर्यापूर येथील गुख्वा कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहून या योजनांचा जास्तीत जारत लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी केले आहे.

CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार, दि. ४ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# पेरणीपूर्वी पावसाच्या अंदाजावर शेतीचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक!



खरीप शेती म्हणजे केवळ बियाणे पेरणे नव्हे, तर शहाणपणाची पावले उचलणे, वेळेवर निर्णय घेणे जे आपल्याला अनिश्चिततेपासून वाचवतात. पावसाचा मागोवा घेण्यापासून ते योग्य वाण निवडण्यापर्यंत, मातीची काळजी घेण्यापासून ते विम्याद्वारे पिकांचे संरक्षण करण्यापर्यंत, प्रत्येक पायरी आपल्यासाठी महत्वाची आहे. आजचा शेतकरी मात्र केवळ शेतकरी नाही, तर जोखीम व्यवस्थापकही आहे. बदलते हवामान, बाजारातील बदलती मागणी आणि वाढता खर्च यामुळे केवळ पारंपरिक पद्धती पुरेशा राहिलेल्या नाहीत. येथेच तयारी, नावीन्य आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना अंमलात येतात.आत्मविश्वासाने नियोजन करून आणि योग्य उपायांनी पिकांचे संरक्षण करून आपल्या खरीप शेती हंगामावर नियंत्रण ठेवा. कारण जेव्हा तुम्ही चांगली तयारी करता तेव्हा तुमची वाढ चांगली होते आणि तोच सोयीस्कर, पर्यावरणपूरक शेतीचा आधार असतो. खरीप हंगाम (जून ते ऑक्टोबर) हा भारतातील मुख्य शेती हंगाम आहे. या काळात चांगल्या उत्पादनासाठी योग्य जमिनीची मशागत, बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया, खतांचे योग्य व्यवस्थापन आणि पावसाच्या अंदाजावर आधारित पीक नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे.

**१. पूर्व मशागत आणि जमीन तयार करणे**
पावसाळ्यापूर्वी शेताची खोल नांगरणी करून घ्यावी, शेतातील कचरा, धसकटे वेचून शेत स्वच्छ करावे, शेवटच्या पाळीपूर्वी १० ते १२ गाड्या चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे, भारी जमिनीत पाण्याचा निचरा होण्यासाठी रुंद वरंबा आणि सरी पद्धतीचा वापर करावा.

**२. बियाण्यांची निवड आणि बीजप्रक्रिया**
पेरणीपूर्वी आपल्या जमिनीनुसार आणि कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या संकरित किंवा सुधारित वाणांचीच निवड करावी, बियाण्यांची उगवणक्षमता तपासून घ्यावी, पेरणीपूर्वी बियाण्यांना 'बीजप्रक्रिया' करणे आवश्यक आहे. यामुळे बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव सुरुवातीलाच रोखता येतो. यासाठी ट्रायकोडर्मा, कार्बेन्डाझिम किंवा रायझोबियमचा वापर करावा.

**३. पेरणी कधी करावी-**
मॉन्सूनचे आगमन झाल्यानंतर जमिनीत ८० ते १०० मिमी पाऊस पडल्यामुळे वापसा (पेरणीयोग्य ओलावा) आल्यावरच पेरणी करावी. घाईघाईने कोरड्या जमिनीत किंवा कमी पावसात पेरणी करू नये. साधारणपणे जूनचा दुसरा आठवडा ते जुलैचा पहिला आठवडा हा पेरणीसाठी सर्वात योग्य कालावधी मानला जातो.

**४. खतांचे व्यवस्थापन-**
माती परीक्षण अहवालानुसारच रासायनिक खतांचा वापर करावा. पेरणीच्या वेळी संपूर्ण स्फुरद आणि पालाश द्यावे आणि नत्रचा पहिला हप्ता द्यावा. खते बियाण्यांच्या खाली २-३ सेमी अंतरावर पडतील, अशी पेरणी यंत्राची रचना असावी.

**५. तण नियंत्रण-**
पिकाच्या सुरुवातीच्या ३० ते ४५ दिवसांत शेत तणमुक्त ठेवणे महत्त्वाचे असते. यासाठी वेळेवर खुरपणी करावी किंवा आंतरमशागतीची कामे (डवरणी/कोळपणी) करावीत. तणनाशकांचा वापर करताना कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त

दोन शतकांपासून वापरात असलेल्या सायकलचे वेगळेपण, दीर्घायुष्य आणि बहुउपयोगिता, तसेच ते वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, विश्वासार्ह, स्वच्छ, पर्यावरणास अनुकूल आणि टिकाऊ साधन असून ते पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यास प्रोत्साहन देते, हे मान्य करून आमसभेने ३ जून हा जागतिक सायकल दिन म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. यामुळे संबंधित घटकांना शाश्वत विकासाला चालना देणे, मुलामुलींसाठी शारीरिक शिक्षणासह शिक्षण अधिक मजबूत करणे, आरोग्याला प्रोत्साहन देणे, आजारांना प्रतिबंध करणे, सहिष्णुता, परस्पर सामंजस्य आणि आदर यांना प्रोत्साहन देणे, तसेच सामाजिक समावेशन आणि शांततेच्या संस्कृतीला चालना देणे यांसारख्या बाबींसाठी सायकलच्या वापरावर भर देण्यास आणि त्याला पुढे नेण्यास प्रोत्साहित केले गेले.



दरवर्षी ३ जून रोजी 'जागतिक सायकल दिन' साजरा केला जातो?सायकलचा वापर वाढावा, त्याद्वारे लोकांचे आरोग्य चांगले राहावे आणि पर्यावरणाचे रक्षण व्हावे, या उद्देशाने संयुक्त राष्ट्राने २०१८ मध्ये या दिनी अधिकृत घोषणा केली. सायकलचे मानवी आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी काय फायदे आहेत.

दुचाकी सायकल ही वापरण्यास आणि विकत घेण्यास सोपी आणि स्वस्त असा वाहन पर्याय आहे. त्यामुळे सर्वांना सामावून घेणारे जागतिक स्तरावरील वाहन म्हणून सायकल कडे पाहणे याबद्दल हा दिवस साजरा करण्याचे ठरविले गेले. समाजतील कोणत्याही स्तरातील व्यक्तींना सायकल चालविण्याचा आनंद घेता यावा यासाठी या दिवशी विशेष सायकल यात्रा आयोजित केल्या जातात. सायकल हे वाहन सहिष्णुता, मानवता यांचे प्रतीक आहे असा संदेश यातून पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त आहे, असा संदेश यानिमित्ताने दिला जातो. २०१५ साली लेझेक सिबिस्की या समाजिक शास्त्र विषयाच्या प्राध्यापकांनी सर्वांसाठी सायकल याविषयी लेख लिहिला. त्यानंतर जाणीव जागृती होऊन सायकल विषयासाठी विशेष दिवस राखून ठेवणे याला महत्व मिळाले. सायकल हे निर्धुर बाहन असल्याने त्यामुळे हवेचे प्रदूषण होत नाही. जागतिक स्तरावरील पर्यावरण प्रश्न वाढता असल्याने सायकल चालवून हवेहे प्रदूषण कमी करण्याचा जागतिक पातळीवरील महत्वाचा संदेश या दिवशी दिला जातो

मध्यम तीव्रतेच्या नियमित शारीरिक हालचालींचे – जसे की चालणे, सायकल चालवणे किंवा खेळ खेळणे – आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण फायदे आहेत. सर्व वयोगटांमध्ये, शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहण्याचे फायदे हे अपघातांसारख्या संभाव्य धोक्यांपेक्षा जास्त असतात. काहीच शारीरिक हालचाल न करण्यापेक्षा थोडीफार हालचाल करणे चांगले. दिवसभरात तुलनेने सोप्या मार्गांनी अधिक सक्रिय राहून, लोक शिफारस केलेली सक्रियतेची पातळी अगदी सहजपणे गाठू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, चालण्यासाठी आणि सायकलिंगसाठी सुरक्षित पायाभूत सुविधा निर्माण करणे हा देखील अधिक आरोग्य समानता साधण्याचा एक मार्ग आहे. सर्वात गरीब शहरी घटकांसाठी, ज्यांना अनेकदा खाजगी वाहने परवडत नाहीत, चालणे आणि सायकलिंग हे वाहतुकीचे एक साधन ठरू शकते, ज्यामुळे हृदयविकार, पक्षाघात, काही प्रकारचे कर्करोग, मधुमेह आणि मृत्यूचा धोकाही कमी होतो. त्यानुसार, सुधारित सक्रिय वाहतूक केवळ आरोग्यदायीच नाही, तर ती न्याय्य आणि किफायतशीर देखील आहे. पायी चालणाऱ्या आणि सायकल चालवणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करणे, हे शहरांना लोकसंख्या वाढीपासून होणारे उत्सर्जन वेगळे करण्यास, तसेच हवेची गुणवत्ता आणि रस्त्यांवरील सुरक्षितता सुधारण्यास मदत करणाऱ्या गतिशीलता उपायांचा एक महत्त्वाचा भाग आहे. कोविड-१९ महामारीमुळे अनेक शहरांना त्यांच्या वाहतूक प्रणालींचा पुनर्विचार करण्यासही भाग पडले आहे.

जागतिक सायकल दिन सायकल वापरण्याच्या फायद्यांकडे लक्ष वेधतो, जे वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, स्वच्छ आणि पर्यावरणास अनुकूल असे शाश्वत साधन आहे. सायकलमुळे हवा अधिक स्वच्छ राहते, वाहतूक कोंडी कमी होते आणि शिक्षण, आरोग्यसेवा व इतर सामाजिक सेवा सर्वात असुरक्षित लोकसंख्येसाठी अधिक सुलभ होतात. आर्थिक वाढीस चालना देणारी, असमानता कमी करणारी आणि हवामान बदलाच्या विरोधातील लढ्याला बळ देणारी एक शाश्वत वाहतूक व्यवस्था, शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

१५ मार्च २०२२ रोजी, आमसभेने शाश्वत विकासासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये सायकलिंगला मुख्य प्रवाहात आणण्यासंबंधीचा ठराव संमत केला . यामध्ये यावर भर देण्यात आला की, सायकल हे शाश्वत वाहतुकीचे एक साधन असून ते शाश्वत उपभोग आणि उत्पादनाला चालना देण्यासाठी एक सकारात्मक संदेश देते, तसेच हवामानावरही त्याचा सकारात्मक परिणाम होतो.



# नगराध्यक्ष केंदळे अनिल, शहरातील समस्या करताहेत नील !

अभियंता श्री.अनिल केंदले यांनी नगराध्यक्ष पदाची सूत्रे घेऊन आज जवळ जवळ १५० दिवस पूर्ण झालेत.१५० दिवसात एखादा राजकारणात नवखा असलेला माणूस काय करेल ? त्यातही एखादा सज्जन,सहृदयी माणूस असेल तर कठीणच ! त्यात हे क्षेत्र म्हणजे ' येथे समस्त दुर्जन असतात लोकं ' अशी राजकारणाची ख्याती.

त्यामुळे सहाजिकच ' एक अकेला अनिल केंदले क्या करेगा ? अशी सर्वसामान्यांची प्रतिक्रिया होती.

पण एक शिकलेला,अभियंती वृत्ती असलेला माणूस ' योजक: तत्र दुर्लभ: ' ठरला.नियोजनबद्ध ,पारदर्शी आणी शिस्तबद्ध कारभारी असला तर काय करू शकतो हे आपल्याला १५० दिवसात दिसले.कुठलाही आततायीपणा नाही,आगाऊ मोठमोठ्या गप्पा नाहीत ,प्रसिद्धीचा हव्यास नाही , बडेजाव तर अजिबात नाही.सर्व अगदी शांतपणे,नियोजनानुसार ,ठाम भूमिका घेऊन लोकहिताची कामे श्री.अनिलभाऊ केंदले करतांना दिसताहेत. खर सांगू ! भाजपा उबाठा एकत्रित येण्याला माझा विरोध होता तो आजही आहे.सभागृहात विरोधी पक्ष हवाच यावर मी आजही ठाम आहे.गावाच्या दृष्टीने ते हितावह असते. शिवाय सर्व एकत्र आले तर ते केंदले साहेबांसारख्या संवेदनशील माणसाला गुंडाळून टाकतील असे माझे मत होते.

पण १५० दिवसाचा कार्यभार पाहता तसे होतांना दिसत दिसत नाही.सर्व नगरसेवक त्यांना शिस्तीत सहकार्य करतांना दिसत आहेत.आजवरच्या इतिहासात जितके सक्रिय नसतील तितके नगरसेवक प्रभागात सक्रिय होतांना दिसत आहेत.न.प.चे अधिकारी कर्मचारी देखिल बऱ्यापैकी कार्यतत्पर झालेले दिसत आहेत.

**एक अकेला अनिल केंदळे क्या कर सकेगा ?**
१) एक अनिल केंदले भर उन्हाळ्यात पाण्याचे नियोजन करून पाणी टंचाईचे संकट घालवू शकतो.
२) एक अनिल केंदले अनेक वर्षापासून रखडलेले रस्ते चकाचक करण्याचा जीवतोड प्रयास करतो.
३) एक अनिल केंदले प्रतिक्षेत असलेले नाट्यगृह सुसज्ज करू शकतो.
४) अंधारातले वाशिम बऱ्यापैकी प्रकाशमय करू शकतो.
५) अस्वच्छ वाशिमला स्वच्छतेकडे नेवू शकतो.
६) कचरा व्यवस्थापनावर जातीने लक्ष घालतोय.
७) बारा पंधरा तास फक्त वाशिमसाठी देतोय.
८)ज्ञानशक्ती,ईच्छाशक्ती आणी क्रियाशक्तीचा वापर करून वाशिमला सर्वांगसुंदर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतोय.

नगराध्यक्ष म्हणून खरे उतरण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे.सगळे एकदम होणार नसले तरी प्रयत्न अचूक आणी प्रामाणिक आहेत.जे जे आम्हाला अपेक्षित आहे ते ते करण्याचा त्यांचा प्रयास कौतुकास्पद आहे.

छोटी अपेक्षा - आता एकदा टेम्पल गार्डन तूर्त जुजबी दुरुस्ती करून ' आहे त्या स्थितीत ' लोकांसाठी खुले करून द्या.दुरुस्त्या होत राहतील यथावकाश !लहान मुले,माता भगिनी,ज्येष्ठ नागरिक येतील तिथे.थोडेफार भेळ,आईसक्रीम,आकाशपाळणे,अशांना सशुल्क परवानगी द्या.असो !

श्रीमान अनिलजी केंदले साहेब ! आपला १५० दिवसाचा आलेख चांगला आहे.असेच निर्णय घ्या.असेच निर्भिड,निर्मोही,निरपेक्ष आणी निडर रहा ! आपल्या अशा प्रत्येक कार्यात वाशिमकर आपल्या सोबत आहेत.

आपल्या तंदुरुस्त १५० दिवसांबद्दल आपले अभिनंदन !

**मी साक्षी भावाने त्यांचे अवलोकन करीत आहे.त्यांचा कामाचा झपाटा आणी सपाटा पाहता**
१)त्यांच्यावर कोणाचा दबाव येवू शकत नाही
२)त्यांच्यावर जबरदस्ती कोणी करू शकत नाही
३)कोणी व्यक्तीगत स्वार्थासाठी वाशीमला वेठीस धरत असेल तर कठोर भूमिका घेतात.
४)जे जनहिताचे आणी जनमताचे तेच ते करतात.
५)दिसायला मृदुनी कुसुमादपी वाटणारे केंदले साहेब वज्रादपी कठोरानी देखिल होऊ शकतात याचा प्रत्यय वाशिमकरांना येतांना दिसतो.
..................

**केंदले साहेब ! आपल्या समन्वय कौशल्याचेही कौतुक.असो.**

**लोकमताचा धांडोळा घेतला तर**
१)यंदाच्या उन्हाळयात नळाचे पाणी नियोजन उत्तम होते.
२)ज्या रस्त्यांसाठी ओरड होती ते रस्ते सुरु झालेत.
३)नाले,नाल्या सफाई,कचरा व्यवस्थापन समाधानकारक आहे.
४)नगराध्यक्ष दस्तूरखुद्द उन्हातान्हाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून आढावा घेतांना दिसताहेत.
४)लोकभावनांचा आदर होतोय.
५) मुख्य म्हणजे नगराध्यक्ष कोणत्याच चांडाळचौकडीत अडकलेले दिसत नाहीत. माझ्या दृष्टीने श्री.अनिल केंदले यांना याबद्दल शाबासकी !

विद्यावाचस्पती
प्रा.दिलीप जोशी
वाशिम
मो. ९८२२२६२७३५

## दिन विशेष
# चतुरस्त्र अभिनयाने प्रेक्षकांना मोहिनी घालणारी अभिनेत्री नुतन



आज जयंती

नूतन (माहेरचे आडनाव समर्थ/सेन, सासरचे बेहल) यांचा जन्म ४ जून १९३६ रोजी झाला. त्या प्रामुख्याने हिंदी चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या एक भारतीय चित्रपट अभिनेत्री होत्या. सुमारे चार दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी ८० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. ज्यात रोमान्सपासून सामाजिक-वास्तववादी नाट्य चित्रपटांपर्यंतचे प्रकार आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नूतनला अनेकदा अपारंपरिक समजल्या जाणाऱ्या संघर्षग्रस्त स्त्रियांच्या पात्रांमध्ये तिच्या नैसर्गिक अभिनय शैलीसाठी ओळख मिळाली होती. तिच्या पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीसाठी विक्रमी पाच फिल्मफेअर पुरस्कारांचा समावेश आहे. १९७४ मध्ये नूतन यांना पद्मश्री हा भारताचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळाला.

चित्रपट निर्माते कुमारसेन समर्थ आणि चित्रपट अभिनेत्री शोभना समर्थ यांच्या पोटी मुंबईत जन्मलेल्या नूतनने वयाच्या १४ व्या वर्षी तिच्या आईने दिग्दर्शित हमारी बेटी या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर तिने नगीना (१९५१) आणि हम लोग (१९५१) चित्रपटांमध्ये काम केले. सीमा (१९५५) मधील तिच्या भूमिकेने तिला व्यापक मान्यता मिळवून दिली आणि तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. ती १९६० च्या दशकात व १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धापर्यंत प्रमुख भूमिका बजावत राहिली आणि सुजाता (१९५९), बंदिनी (१९६३), मिलन (१९६७) आणि मैं तुलसी तेरे आंगन की (१९७८) मधील भूमिकांसाठी तिने इतर चार प्रसंगी फिल्मफेअर पुरस्कार जिंकले. या काळातील तिच्या इतर काही चित्रपटांमध्ये अनाडी (१९५९), छलिया (१९६०), तेरे घर के सामने (१९६३), खानदान (१९६५), सरस्वतीचंद्र (१९६८), अनुराग (१९७२) आणि सौदागर (१९७३) यांचा समावेश होतो.

१९८० च्या दशकात, नूतनने व्यक्तिरेखात्मक पात्र साकारण्यास सुरुवात केली आणि तिच्या मृत्यूच्या काही काळापूर्वीपर्यंत ती काम करत राहिली. साजन की सहेली (१९८१), मेरी जंग (१९८५) आणि नाम (१९८६) यांसारख्या चित्रपटांमध्ये तिने मुख्यतः आईच्या भूमिका साकारल्या. मेरी जंग मधील तिच्या अभिनयामुळे तिला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री श्रेणीत सहावा आणि अंतिम फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. नूतन यांनी नौदल लेफ्टनंट-कमांडर रजनीश बहल यांच्याशी १९५९ मध्ये विवाह केला होता. १९९१ मध्ये स्तनाच्या कर्करोगाने तिचा मृत्यू झाला. त्यांचा एकुलता एक मुलगा मोहनीश बहल हा अभिनेता आहे.

१९४५ मध्ये तिच्या वडिलांच्या नल दमयंती या चित्रपटात नूतन पहिल्यांदा लहानपणी कॅमेऱ्यासमोर दिसली. वयाच्या १४ व्या वर्षी तिची आई दिग्दर्शित हमारी बेटी (१९५०) मध्ये नायिकेची भूमिका करून तिच्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर रवींद्र दवे यांचा सस्पेन्स थ्रिलर चित्रपट नगीना (१९५१) आला आणि या चित्रपटातील नूतनच्या अभिनयाने तिला अधिक ओळख मिळाली. हा चित्रपट तिचा पहिला व्यावसायिक यश ठरला. त्याच वर्षी प्रदर्शित झालेला सामाजिक नाट्य चित्रपट हम लोग होता ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये ती लोकप्रिय झाली. नगीना आणि हम लोग यांनी एक उगवता तारा म्हणून तिचे स्थान मजबूत केले.

# भारतातील एकमेव महिला विद्यापीठ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी




श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एसएनडीटी विद्यापीठ) हे भारतातील एक महिला विद्यापीठ आहे. याची स्थापना महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केली. हे भारतातील पहिले महिला विद्यापीठ आहे. एसएनडीटीची स्थापना पुण्यातली असली तरी त्याचे स्थलांतर मुंबईस होऊन तिथेच खऱ्या विस्ताराला सुरुवात झाली. या विद्यापीठाशी संबंधित सगळी महाविद्यालये एसएनडीटी कॉलेज म्हणून ओळखली जाऊ लागली.

डिसेंबर, इ.स. १९१५ साली धोंडो केशव कर्वे यांनी इंडियन सोशल काँग्रेसच्या (भारतीय सामाजिक परिषद) अध्यक्षीय भाषणातून महिला विद्यापीठाची कल्पना सर्वप्रथम मांडली. ३ जून, इ.स. १९१६ रोजी विद्यापीठाची औपचारिक स्थापना झाली. पाच विद्यार्थिनींचा पहिला वर्ग ५ जुलै, इ.स. १९१६ रोजी सुरू होऊन विद्यापीठाच्या कामाला आरंभ झाला. इ.स. १९१६ साली या विद्यापीठाची स्थापना भारतवर्षीय महिला विद्यापीठ (इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी) या नावाने झाली. सर विठ्ठलदास ठाकरसींनी या विद्यापीठाला १५ लाख रुपयांची देणगी दिल्यानंतर विद्यापीठाला त्यांच्या आईचे नाव देण्यात आले. १९२० साली विद्यापीठाचे नाव 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे झाले. विद्यापीठातर्फे सुरुवातीला जी.ए. (गृहीतागमा) आणि पी.ए. (प्रदेयागमा) अशा दोन पदव्या दिल्या जात असत. इ.स. १९५१ साली या विद्यापीठाला महाराष्ट्र सरकारची मान्यता मिळाली. इ.स. १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात एक वेगळे कलम (क्रमांक १०५) केवळ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी आहे. या विद्यापीठास महाराष्ट्रात तसेच इतर कोणत्याही राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात महाविद्यालये संलग्नित करता येतात. इ.स. १९५२ ते १९५७ या कालावधीत दिवाणबहादुर झवेरी यांनी कुलगुरुपद सांभाळले व यानंतर मात्र एक तप (१९५७ ते १९६९) लेडी ठाकरसींनी. या शेवटच्या बारा वर्षांत १३ नवीन विभागांची/महाविद्यालयांची स्थापना झाली. यात मराठी, चित्रकला हे विभाग मुंबई व पुणे येथे, तसेच नर्सिंग महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गृहविज्ञान महाविद्यालय ही महत्त्वाची महाविद्यालये होती. अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, ग्रंथपालनशास्त्र, फूड सायन्स अँड न्युट्रिशन अशा पदव्युत्तर विभागांचा समावेशही होता. १९७१ ते १९७५ या काळात आणखी ११ विभागांची भर पडली आणि शिवाय पुण्यात एक शिक्षणशास्त्र महाविद्यालय ही स्थापन झाले. भारतातील विद्यापीठात अन्यत्र न दिसणारे महिला विद्यापीठाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अनेक विभाग आहेत. दोन शिक्षणशास्त्र विभाग, स्पेशल एज्युकेशन, शैक्षणिक तंत्रविज्ञान, मार्गदर्शन आणि समुपदेशन, शैक्षणिक व्यवस्थापन, भाषा अध्यापन, तसेच विद्यापीठ संचालित दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालये सुद्धा आहेत.

**कर्वेंनी दूरसि शिक्षणाचा केला होता विचार**
कर्वे यांनी दूरस्थ शिक्षणाचा हा विचार विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच केला होता. सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या मातोश्री दिवंगत कमलाताई काकोडकर आणि अशा अनेक स्त्रियांनी स्वतःचे घर, संसार, नोकरी, उद्योग सांभाळून दूरस्थ शिक्षण पद्धतीने उच्च शिक्षण घेतले. एम.कॉम. हा ८० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्णतः ऑनलाइन प्रणालीने शिकवला जातो. आता ऑगस्ट २०१५ पासून एम.ए. इन एज्युकेशन हा अभ्यासक्रमही पूर्णतः ऑनलाइन करण्यात आला होता.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. ४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# गुटख्याची विक्री, वाहतूक करणाऱ्या सोबतच आता कंपनी मालकावर होईल कारवाई

प्रतिनिधी ४ जून

♦ अन्न व औषध विभागाच्या आयुक्तांचे निर्देश



**अकोला :** राज्यात गुटखा बंदी असताना सुद्धा सर्रासपणे सर्वत्र गुटखा मिळतो गुटख्यावर कारवाईचे आदेश आदेश असल्यावरही गुटख्याची विक्री थांबलेली नाही गुटखा विक्री करणाऱ्या टोळ्या जिल्ह्यात सक्रिय असून परराज्यातून गुटखा आणून जिल्ह्यात विक्री केली जात आहे. परंतु आता अवैध गुटखा विक्रेत्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी धडाकेबाज निर्णय घेतला आहे गुटख्यावर कारवाई करताना थेट कंपनी मालकाविरोधात गुन्हे दाखल करून त्यांना आरोपी करा असे स्पष्ट आदेश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिले असल्याची माहिती आहे यापूर्वी केवळ गुटख्याची वाहतूक तसेच विक्री करणाऱ्या विरोधात कारवाई होत होती मात्र आता गुटखा कंपनीच्या मालकावर कारवाई केली जाणार आहे अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मुंडे यांनी राज्यात धडाकेबाज कारवाया सुरू केल्या आहेत आता राज्यातील गुटखा व पान मसाल्यावर कारवाई करण्याचा त्यांनी आदेश दिला आहे त्यांच्या आदेशानुसार राज्यात ठीक ठिकाणी छापे टाकून गुटखा जप्त करण्यात येत आहे राज्यात गुटखा विक्रीस बंदी आहे असे असताना कर्नाटक गुजरात तसेच मध्यप्रदेशातून गुटका महाराष्ट्रात विक्रीसाठी आणला जातो बुटक्याची वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतात मात्र मूळ मालकांवर कारवाई होत नाही

**अकोला शहरात गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री**

अकोला शहरात तसेच जिल्ह्यातही गुटख्याची सर्रास विक्री होत आहे विविध कंपन्यांचा गुटखा सर्वत्र उपलब्ध आहे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत मात्र शहरातील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी ढिम्म भूमिका घेतली आहे. गुटखा तर सोडा साध्या फळ विक्रेत्यांवर सुद्धा कारवाई केली जात नाही. अन्न व औषध विभागाच्या आयुक्तांनी आदेश दिल्यानंतरही शहरात गुटख्याची विक्री थांबलेली नाही गुटखा विक्री करणाऱ्या टोळ्या जिल्ह्यात सक्रिय असून पर राज्यातून गुटखा आणून ग्रामीण भागात तसेच शहरात विक्री केली जात आहे

कारवाईदरम्यान जप्त केलेल्या गुटख्यावर कंपनीचे नाव व पत्ता ही असतो परंतु त्या दिशेने तपास होत नाही फक्त वाहतूक करणाऱ्यांवरच कारवाई होते आता थेट गुटख्याच्या कंपनी मालकाविरोधात गुन्हे दाखल करण्यात येणार असून गुटकाबंदीची कडक अंमलबजावणी केली जाणार आहे शहरात तसेच जिल्ह्यात अनेकदा पोलिसांनी छापा टाकत गुटख्याचा माल पकडला आहे. विक्री करणाऱ्यांना तसेच वाहतूक करणाऱ्यांना अटक सुद्धा करण्यात आली आहे मात्र हा गुटखा कुठून आला कोणत्या कंपनीत तयार झाला याचा शोध घेण्याची तसदी पोलिसांनी घेतली नाही यापुढे गुन्हा दाखल करताना कंपनीच्या नावाचा उल्लेख केला जाणार असून कंपनी मालकांना आरोपी केले जाणार आहे.

# कृषी विभागाची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

♦ ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द, ३ निलंबित

**अकोला :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात कृषि निविष्ठा विक्रीत अनियमितता आढळल्याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मोठी कार्यवाही केली असून तपासणी आणि सुनावणीअंती ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, ३ केंद्रांचे परवाने १ ते २ महिन्याकरिता निलंबित करण्यात आले आहेत. तर इतर ६ केंद्रांना त्रुटी बाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे. या कारवाईमुळे नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्या केंद्रचालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

**या कृषी केंद्रांवर झाली कठोर कारवाई**

तपासणी व सुनावणी दरम्यान समाधानकारक खुलासा, स्पष्टीकरण न देऊ शकल्याने अकोट तालुक्यातील बोर्डी येथील राय कृषी सेवा केंद्र, अकोली जहाँगीर येथील मोहन ट्रेडर्स, तेल्हारा तालुक्यातील तळेगाव बु. येथील महालक्ष्मी कृषी सेवा केंद्र, पातूर तालुक्यातील सस्ती येथील शिवशक्ती ?ग्रोटेक, पातूर येथील खानापूर रस्त्यावरील शेतकरी कृषी सेवा केंद्र, वाडेगाव येथील बळीराजा कृषी सेवा केंद्र आणि बादलापूर येथील जगदंब अँग्रो एजन्सीज व अँग्रोटेक या सात केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, बाळापूर तालुक्यातील निंबा फाटा येथील आपलं ग्रोमर कृषी सेवा केंद्र यांचे एका महिन्यासाठी, तेल्हारा तालुक्यातील वारखेड येथील शेतकरीपुत्र कृषी सेवा केंद्राचे दोन महिन्यांसाठी व कापशी रोड येथील मातोश्री कृषी सेवा केंद्राचे एका महिन्यासाठी परवाना निलंबन करण्यात आले आहे.

कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) तालुका कृषि अधिकारी कार्यालय व कृषी अधिकारी, पंचायत समिती यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विविध कृषी केंद्रांची अचानक तपासणी केली होती. या मोहिमेत एकूण १६ कृषी केंद्रांमध्ये गंभीर व नियमबाह्य बाबी आढळून आल्या. 'इ-पॉस' (I-इदए) मशीनमधील अधिकृत साठा आणि प्रत्यक्ष दुकानात उपलब्ध असलेला साठा यात मोठी तफावत आढळली. दुकानात साठा फलक आणि चालू दर फलक अद्ययावत ठेवले नव्हते. तसेच, शेतकऱ्यांना अधिकृत 'पक्की बिले' न देणे किंवा दिलेली बिले विहित नमुन्यात नसणे, केंद्राचे अधिकृत परवाना/नोंदणी प्रमाणपत्र ग्राहकांना दिसेल अशा ठिकाणी न लावणे या त्रुटींच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या सुनावणीत उचित खुलासा उत्तर न मिळाल्याने ही कडक कारवाई करण्यात आली. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात खरीप हंगामासाठी पुरेसा खत आणि बियाणे साठा उपलब्ध आहे. मात्र, फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी करताना खालील गोष्टींची काळजी घ्यावी. खरेदी केल्यानंतर विक्रेत्याकडून विहित नमुन्यातील पक्के बिल आवर्जून मागावे. बिलावर लॉट नंबर, बॅच नंबर आणि योग्य किंमत लिहिलेली आहे का, याची शहानिशा करा. नेहमी नामांकित आणि नोंदणीकृत कंपन्यांच्याच कृषी निविष्ठांना प्राधान्य द्यावे.

**तक्रार कोठे करावी?**

♦ जर कोणत्याही कृषी केंद्रचालकाने बियाणे किंवा खतांचा काळाबाजार केला, जादा दराने विक्री केली किंवा पक्के बिल देण्यास नकार दिला, तर शेतकऱ्यांनी त्वरित आपल्या तालुक्यातील पंचायत समिती किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील 'तक्रार निवारण कक्षात' संपर्क साधावा, लेखी तक्रार करावी असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# समृद्धी महामार्गावर शेलू बाजार ते मालेगाव जवळ संजय ट्रॅव्हल्सची ट्रकला धडक, 15 प्रवासी जखमी

प्रतिनिधी ४ जून



**वाशिम :** वाशिमच्या समृद्धी महामार्गावर शेलू बाजार ते मालेगाव दरम्यान आज पहाटे एका लक्झरी ट्रॅव्हल्सने समोरील ट्रकला धडक दिल्यामुळे भीषण अपघात झाल्याची घटना घडली.या अपघातात ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी जखमी झाले असून चार जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.वाशीम जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावरून संजय ट्रॅव्हल्स कंपनीची बस नागपूरहून पुण्याकडे जात होती.दरम्यान आज पहाटे २ ते ३ च्या सुमारास मालेगाव ते शेलुबाजार जवळ असलेल्या कवरदरी येथे या लक्झरी ट्रॅव्हल्सने समोरील एका ट्रकला जोरदार धडक दिली.या भिषण अपघातात ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी जखमी झाले असून चालक आणि क्लिनरसह दोन प्रशांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, बचाव पथक व आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाले.जखमींना तातडीने वाशीम आणि अकोला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या उपचार सुरू आहे.चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

# वादळवाऱ्यामुळे केळी उत्पादकांचे नुकसान

प्रतिनिधी ४ जून

♦ शासनाकडे मदतीची मागणी

**बाळापूर :** अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे लाखोचे नुकसान झाले. १ जून रोजी संध्याकाळी वादळी वारा केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवणारा ठरला. पीक काही दिवसात काढणीला येणार होते.

पण वादळ वाऱ्याचा केळीच्या संपूर्ण पिकाला जबरदस्त फटका बसला. यामुळे बाळापूर तालुक्यासह जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकरी हा निसर्गाच्या या लहरीपणाला बळी पडला आहे. शासनाने काही प्रमाणात बुडत्याला काठीचा आधार याप्रमाणे लवकरात लवकर मदत जाहीर करावी व या अडचणीच्या काळात



शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे हीच आशा केळी उत्पादक शेतकरी मनाशी बाळगून आहेत. एक निवेदन बाळापूर तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी तहसीलदार वैभव फरताळे यांना देण्यात आले. जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना या पिकासाठी पिक विमा लागू करून शासकीय संरक्षण मिळावे अशी अपेक्षा केली.

# शासकीय कार्यालयातील वॉटर कुलर रिकामे

प्रतिनिधी ४ जून

♦ महिला व बालकल्याण विभागातील प्रकार

**अकोला :** शहरातील संतोषी माता मंदिर जवळील महिला व बाल कल्याण विभाग कार्यालयात पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना पाण्याच्या शोधात वनवन भटकावे लागत आहे. महिला व बालकल्याण दोन वॉटर कुलर बसविण्यात आले, परंतु दोन्ही वॉटर कुलर मध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे या कार्यालयात येणारे नागरिक चांगलेच वैतागले आहेत. गेल्या काही दिवसांपासून महिला व बालकल्याण विभाग कार्यालयात लाडकी बहीण योजनेच्या कामासाठी महिला आपल्या मुलांसह कार्यालयात तासंतास बसून राहतात, या ठिकाणी येणाऱ्या महिलांना पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने त्यांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. एकीकडे या कार्यालयात कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पाण्याची कॅन ची व्यवस्था करण्यात आली आहे, तर दुसरीकडे कामकाजाकरता येणारे नागरिक तसेच तहानलेले दिसून येत आहेत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याबाबतच्या व्यवस्थेबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता या कार्यालयातील पाणीपुरवठा करणारी सबमर्सिबल बोअर काम करीत नसल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून कार्यालयाकडून नागरिकांकरता पाण्याची त्यांची व्यवस्था करीत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# पुनर्वसनाशिवाय धरणाचे काम नाही !

♦ संतप्त रोहणखेडा-पर्वतापूर ग्रामस्थांनी धरणाचे काम पाडले बंद

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती :** पेढी बॅरेजसाठी तब्बल ८५० एकर जमीन देऊन विस्थापित झालेल्या रोहणखेडा-पर्वतापूर येथील नागरिकांचा संयम अखेर सुटला असून पुनर्वसनाच्या मागणीसाठी त्यांनी थेट धरणाच्या कामावरच ब्रेक लावला आहे. 'आधी पुनर्वसन, मग धरणाचे काम' अशी ठाम भूमिका घेत संतप्त ग्रामस्थांनी पुनर्वसन स्थळी सुरू असलेले धरणाचे काम बंद पाडत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षापासून पुनर्वसनाच्या प्रश्नावर प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मौजे रामगाव येथील गट क्रमांक ४३ ची जमीन संपादित होऊन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असताना गट क्रमांक ११९ च्या संपादनाबाबत मात्र जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. २ जून रोजी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांना निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्याने संतप्त नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. धरणासाठी जमीन दिल्यानंतर शेती, रोजगार आणिउदरनिर्वाहाची साधने हिरावली गेली असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. 'प्रशासनाला धरणाचे काम महत्त्वाचे वाटते; मात्र ज्यांच्या जमिनी गेल्या त्या विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न दुर्लक्षित केला जात आहे.

# आमदार हरीश पिंपळे यांनी लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाची केली पाहणी

प्रतिनिधी ४ जून

**मुर्तिजापूर :** श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाला आमदार हरीश पिंपळे यांनी भेट देऊन विविध विभागांची सविस्तर पाहणी केली. रुग्णालयातील आरोग्य सेवा, स्वच्छता व रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी आमदार पिंपळे यांनी एक्स-रे विभाग, ईसीजी विभाग, लसीकरण कक्ष, रुग्ण वॉर्ड तसेच स्वयंपाकगृहाची पाहणी करून रुग्णांना मिळणाऱ्या सेवांची माहिती घेतली. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रत्येक नागरिकाला सरकारी रुग्णालयात दर्जेदार उपचार, आवश्यक औषधे आणि उत्तम आरोग्य सुविधा वेळेवर



उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच रुग्णालय परिसरातील स्वच्छता आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. या पाहणी दरम्यान नगराध्यक्ष हर्षल साबळे, भाजप तालुकाध्यक्ष नंदकिशोर राऊत, रुग्णसेवक सुनीलभाऊ लछ्वाणी, नगरसेवक लखन मिलके, वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र नेमाडे तसेच रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास आमदार हरीश पिंपळे यांनी यावेळी व्यक्त केला.

# खामगावात चोरी; रोकड लंपास !

प्रतिनिधी ४ जून

**खामगाव :** शहरातील शिवाजीनगर परिसरात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करत, तब्बल ५ लाख २० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. शिवाजीनगर जुना फैल परिसरात राहणारे योगेश प्रभाकर केवारे (वय ४०) हे संगणक जॉबवर्कचा व्यवसाय करतात. १ जून रोजी सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत त्यांच्या घरात कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर उघडून त्यामध्ये ठेवलेली ५ लाख २० हजार रुपयांची रोकड घेऊन पोबारा केला. सायंकाळी घरी परतल्यानंतर ही चोरी उघडकीस आली. घटनेची खात्री झाल्यानंतर योगेश केवारे यांनी २ जून रोजी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# प्रेमसंबंधाचे रूपांतर मारहाणीत!

नगरसेवकाचा महिलेवर संशय, भररस्त्यात चप्पलांनी हल्ला



**यवतमाळ :** प्रेमसंबंधातून सुरू झालेला वाद अखेर मारहाणीपर्यंत पोहोचल्याची धक्कादायक घटना घुग्घुस येथे उघडकीस आली आहे. नगर परिषदेचे अपक्ष नगरसेवक पंकज धोटे यांनी एका महिलेला भररस्त्यात हाताबुक्क्यांनी व पायातील जोड्याने मारहाण केल्याचा आरोप असून, या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. ४ जून) सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास लॉयड्स मेटल्स कंपनीच्या प्रवेशद्वाराजवळ संबंधित महिला उभी होती.

यावेळी नगरसेवक पंकज

**दोन वर्षांचे प्रेमसंबंध; संशयातून वादाची ठिणगी**

सूत्रांच्या माहितीनुसार, मागील दोन वर्षांपासून नगरसेवक पंकज धोटे आणि संबंधित महिलेमध्ये प्रेमसंबंध होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून नगरसेवक महिलेवर संशय घेत होते. याच कारणावरून वारंवार शिवीगाळ आणि वाद होत असल मारहाणीपर्यंत पोहोचल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

लोकप्रतिनिधीच कायदा हातात घेत असल्याने संताप

सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीकडूनच महिलेवर मारहाण झाल्याचा आरोप समोर आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

धोटे तेथे पोहोचले आणि 'तू कोणाशी बोलतेस?' असा जाब विचारत संतापाच्या भरात महिलेवर तुटून पडले.


# अकोला शहरात अतिक्रमणविरोधात महापालिकेची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

बसस्थानक, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर परिसरातील अतिक्रमणे हटवली
विदर्भ हॉस्पिटलसमोरील रस्ते मोकळे नागरिकांनी व्यक्त केले समाधान

**अकोला :** अकोला शहरातील वाढत्या अतिक्रमणाच्या समस्येवर अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. बसस्थानक परिसर, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर तसेच विदर्भ हॉस्पिटलसमोरील मुख्य रस्त्यावर करण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत अनेक अनधिकृत बांधकामे, हातगाड्या आणि रस्त्यावरील अडथळे हटविण्यात आले. या कारवाईमुळे वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण दूर झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

अकोला शहरातील प्रमुख रस्ते आणि व्यापारी भागांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत होती. याची दखल घेत प्रशासनाने विशेष



अतिक्रमण हटाव मोहीम राबवत बसस्थानक परिसर, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर आणि विदर्भ हॉस्पिटलसमोरील भागात धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत हातगाड्या, फेरीवाले, तात्पुरती शेड्स तसेच इतर अतिक्रमणे हटविण्यात आली. प्रशासनाच्या पथकाने संबंधितांना पूर्वसूचना देत नियमानुसार कारवाई केल्याची माहिती मिळाली आहे. अतिक्रमणामुळे नागरिकांना तसेच रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः विदर्भ हॉस्पिटल परिसरात रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना वाहतुकीच्या समस्येमुळे त्रास सहन करावा लागत होता.या कारवाईनंतर संबंधित भागातील रस्ते मोकळे झाले असून वाहतुकीला दिलासा मिळाला आहे. अतिक्रमण पुन्हा होऊ नये यासाठी प्रशासनाने नियमित पाहणी करून आवश्यक ती कारवाई सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.शहरातील रस्ते अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे आणि सार्वजनिक जागांवर अनधिकृत अतिक्रमण टाळावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाघ शिकार प्रकरणातील महिलेचा जामीन अर्ज फेटाळला

वि प्रतिनिधी ४ जून

**अकोट:** मेळघाट-अकोट वन्यजीव विभागाच्या हद्दीतील वाघ शिकारी प्रकरणातील महिला आरोपी गजेंद्रीबाई ऊर्फ शीतल रतन ऊर्फ टेरालिन पारधी (रा. देवरी, मध्य प्रदेश) हिचा जामीन अर्ज अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी फेटाळला. खिरकुंड वनक्षेत्रात ६ ऑगस्ट २०१३ रोजी वाघाची शिकार करून त्याची कातडी व हाडे विकल्याप्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात आरोपीला मध्य प्रदेशातील मंडला कारागृहातून प्रॉडक्शन वॉरंटद्वारे ताब्यात घेण्यात आले होते. सरकार पक्षातर्फे अँड. अजित देशमुख यांनी युक्तिवाद करताना या प्रकरणातील इतर आरोपींना यापूर्वी शिक्षा झाल्याचे तसेच गजेंद्रीबाई २०१२ पासून फरार असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तिच्याविरुद्ध अन्य वन्यजीव शिकारीचे गुन्हेही दाखल असल्याचा दावा करण्यात आला. यानंतर न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळण्याचा आदेश दिला.

सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि.४ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## कुऱ्हा पोलिसांनी पकडली ८४ हजारांची गावठी दारू

**कुऱ्हा :** स्थानिक पोलिसस्टेशनच्या हद्दीत माळेगाव शिवारातील बोरनदीच्या काठावर गावठी दारूची निर्मिती सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

या माहितीवरून पोलिसांनी धाड टाकून आरोपी देविदास अवधुत उके रा. माळेगाव याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून ४८ पिंपे मोहा सडवा, ३०० लीटर हातभट्टीची दारू व इतर साहित्य असा एकूण ८४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलिस अधीक्षक तोटेवाड, एसडीपीओ थोरात यांच्या मार्गदर्शनात कुऱ्हा पोलिसस्टेशनचे स.पो.नि. अमोल तुळजेवार, पीएसआय विलास थुल, पोहेकॉ सपना निरगुळे, अनिल निंघोट, पो. कॉ. सागर निमकर, हेमंत डहाके यांच्या पथकाने केली.



आमदार रवि राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी १ तास भेट घेऊन राजकीय आणि विकासात्मक कामावर चर्चा केली.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्र देशात टॉपर

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत दि. २९ मे रोजी देशात आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक १५ हजार घरांवर प्रकल्प बसविण्यात आले असून त्यापैकी ४,७०० घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी महाराष्ट्राचे अभिनंदन केले असून राज्याने ६ लाखापेक्षा अधिक घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या निवडक राज्यांच्या गटात प्रवेश केल्याबद्दलही कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीने वेग घेतला आहे. मे महिन्यात योजनेसाठी सादर अर्जांमध्ये देशात प्रथम क्रमांक, प्रकल्प बसविलेल्या एकूण घरांमध्ये दुसरा क्रमांक, प्रकल्पांच्या तपासणीमध्ये पहिला क्रमांक आणि पुरवठादारांच्या नोंदणीमध्ये दुसरा क्रमांक अशा रितीने या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या पाच टॉपर राज्यांमध्ये समाविष्ट झाला आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात महावितरणमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. या यशाबद्दल राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती वीज ग्राहकांना घराच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी थेट अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. या योजनेच्या अंमलबजावणीत वीज ग्राहकांकडून अर्जांची स्वीकृती, प्रत्यक्ष प्रकल्प बसविणे आणि त्याची तपासणी करून तो सुरू करणे हे तीन महत्त्वाचे टप्पे असतात. मे महिन्यात या योजनेसाठी देशभर विशेष अभियान चालविण्यात आले होते त्यामध्ये महाराष्ट्र राज्य टॉपर ठरले आहे.

योजनेसाठी मे महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये ४ लाख ४९ हजार अर्जांसह महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. गुजरात (३ लाख), उत्तर प्रदेश (१ लाख), राजस्थान (४४ हजार) व केरळ (३५ हजार) या राज्यांचा महाराष्ट्रानंतर क्रमांक लागतो.

छतावर सौरऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य ५४ हजार प्रकल्पांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. याबाबतीत उत्तर प्रदेश (६४ हजार), गुजरात (३५ हजार), राजस्थान (२६ हजार) व केरळ (२० हजार) ही अन्य राज्ये टॉप पाच राज्यांमध्ये आहेत.

## अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर अमरावती ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती :** अवैध दारू विक्री करणा-यांवर अमरावती ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई केली.

पोलीस अधिक्षक यांनी अमरावती ग्रामीण जिल्हयामध्ये होत असलेल्या अवैध हातभट्टी गावठी दारू तयार करणारे व विक्री करणा-यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने केलेली कारवाई केली यामध्ये पो.स्टे. शिरजगाव : दि. ०२/०५/२६ रोजी पो.स्टे. शिरजगाव कसबा हद्दीत पाळा येथे मेधा नदी काठी छापा कारवाई केली असता आरोपी कसंजु काशीनाथ कासदेकर, वय ३१ वर्ष, रा. बेतुल, मध्यप्रदेश, अब्दुल अन्सार शेख तुराप, वय ४८ वर्ष, रा. खोमई, ता. भैंसदेही, मध्यप्रदेश यांचे



ताब्यातून २०० लीटर गा.हा.भ. दारू किं.अं. २०,०००/-, मोहमाच सडवा ३,००० लीटर किं.अं. १,२०,०००/- तसेच दारू बनविण्या साठी वापरण्यात येणारे गुळ, नवसागर इ. साहीत्य किं.अं. १३,१००/- असा एकूण १,५२,९००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पो.स्टे. मंगरूळ च. आज रोजी मंगरूळ चवाळा पारधी बेडयावर छापा कारवाई केली असता, आरोपी सपना किसन भोसले, वय ३५ वर्ष, रा. मंगरूळ च रेशमा प्राणहंस भोसले, वय ४५ वर्ष, रा. मंगरूळ च., ललित उकंडा भोसले, वय ६४ वर्ष, रा. मंगरूळ च. या तिन्ही आरोपींचे ताब्यातून एकूण २५० लीटर गा.हा.भ. दारू किं. अं. २५,०००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला व मोहमाच सडवा एकूण ४०० ली किं.अं. २२,५००/- रू असा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.

पो.स्टे. ब्राम्हणवाडा सदर कारवाई दरम्यान आरोपी नामे जामवंत टीमाजी थोटे, वय ५८ वर्ष, रा. चिचकुंभ यांचे राहते घरी छापा कारवाई केली असता त्यांचे ताब्यातून ७५ लीटर गा.हा.भ. दारू आणि गुळ, नवसागर इ. साहीत्य किं.अं. १५,०००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला व रनिंग हातभट्टी सुरू असताना रेड केली असता अंदाजे २०० लीटर मोहमाच सडवा किं.अं. २,००,०००/- रू चा मिळून आल्याने तो जप्त करून नष्ट करण्यात आला.

तसेच काल ०१/०५/२०२६ रोजी पो.स्टे. शिरजगाव हद्दीतील ग्राम पाळा नजीक (महाराष्ट्र-मध्यप्रदेश सिमेवरिल) मेघा नदीपात्रात छापा कारवाई करून गावठी हातभट्टी चालक आशिक कासदेकर, रा. सुपाळा (मध्यप्रदेश) यास ताब्यात घेवून १२० लीटर गा.हा.भ. दारू किं.अं. २४,०००/- २) २४०० लीटर मोहमाच सडवा किं.अं. २,४०,०००/- तसेच इतर साहीत्य गुळ, नवसागर इ. साहीत्य ५०,७५०/- असा एकूण ३,१४,७५० रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अशाप्रकारे एकूण ६४५ लीटर गा.हा.भ. दारू कि.अं ८४,०००/-, मोहमाच सडवा एकूण ६००० लीटर किं. अं ५,६३,८५०/- व इतर दारू बनविण्याचे साहीत्य किं. अं. ६३,८००/- असा एकूण ७,११,६५०/- रू चा मुद्देमाल मिळून आला. सदरची कार्यवाही निकेतन कदम पोलीस अधिक्षक, अम. ग्रा., यांचे आदेशान्वये दत्ता तोटेवाड, (म.पो.से.) अपर पोलीस अधिक्षक, अम.ग्रा., यांचे मार्गदर्शनात किरण वानखडे, पो.नि. स्था.गु.शा., अमन शिरसाट, ठाणेदार, शिरजगाव., . प्रशांत जाधव, ठाणेदार,

## १९६२ हेल्पलाइन व व्हॉट्सप चॅटबॉटमुळे पशुवैद्यकीय सेवा घरपोच

◆ ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार ; शेतकऱ्यांसाठी डिजिटल सुविधांचा विस्तार

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** राज्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांना तात्काळ व सुलभ पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड (BFIL) आणि इंडसइंड बँकेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारी '१९६२ टोल-फ्री हेल्पलाइन' प्रभावी ठरत आहे. गेल्या पाच वर्षांत या उपक्रमाद्वारे राज्यातील ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून ग्रामीण व दुर्गम भागातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पशुपालकांनी १९६२ हेल्पलाइन व व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

मोबाईल व्हेटर्नरी युनिट्सच्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवा थेट शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. या उपक्रमाच्या यशानंतर सेवा अधिक गतिमान आणि डिजिटल करण्याच्या उद्देशाने व्हॉट्सॲप-आधारित चॅटबॉट सेवा सुरू करण्यात आली आहे.

शेतकरी आणि पशुपालक +९१ ९०६३१४२२९९ या क्रमांकावर व्हॉट्सॲपवर ठप्ठ असा संदेश पाठवून किंवा क्यूआर कोड स्कॅन करून या सेवेचा लाभ घेऊ शकतात. या माध्यमातून पशुधनाचे आजार, उपचार, लसीकरण, पशुसंवर्धनविषयक माहिती तसेच विविध शासकीय योजनांची माहिती मिळते. तसेच चॅट, ऑडिओ कॉल आणि व्हिडिओ कॉलद्वारे पशुवैद्यकीय तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

या चॅटबॉटमध्ये पशुवैद्यकीय टेलिकन्सल्टेशन, पशुवैद्यकीय रुग्णालयांची माहिती, सेवा निर्देशिका, शासकीय योजनांची माहिती आणि वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे यांचा समावेश करण्यात आला आहे.

ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६ या कालावधीत ६१५ शेतकऱ्यांनी चॅटबॉटचा वापर केला असून २०१ व्हिडिओ कन्सल्टेशन यशस्वीरित्या पार पडली आहेत. त्यामुळे पशुधनाच्या आरोग्याशी संबंधित समस्यांवर त्वरित मार्गदर्शन मिळत असून शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होत आहे. राज्यातील पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम, सुलभ आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे पशुसंवर्धन विभागाने सांगितले, असेही पशुसंवर्धन विभागाव्दारे सांगण्यात आले आहे.

## मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी डीएनए चाचणी केली

◆ मृतदेह काजल इंगळे यांचा असल्याचे निष्पन्न
◆ या हत्येमागे प्रेमप्रकरण असल्याचा संशय

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** गडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तापोवन टेकडी जंगलातील नाल्यात मंगळवारी सापडलेल्या अर्धवट जळालेल्या महिलेच्या मृतदेहाची अखेर ओळख पटली आहे.

मृत महिलेची ओळख काजल जितेंद्र इंगळे (वय २१, विश्रोळी, चांदूर बाजार तालुका) अशी पटली आहे.

तिच्या कुटुंबीयांचा आरोप आहे की, तिच्या माजी प्रियकराने त्याच्या साथीदारांसह लोखंडी सळीने तिच्या तोंडात आणि पोटात वार करून तिची निर्घृण हत्या केली आणि नंतर तिचा



मृतदेह जाळून टाकला. आई-वडिलांनी आपल्या मुलीला तिच्या कपड्यांवरून ओळखले. पोलिसांनी दोघांचेही



डीएनए नमुने घेतले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी तिचा माजी प्रियकर, साहिर्ता टानो याला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

## वाघिणीला नव्हे तर तिच्या शावकाला परतवाडा येथे हलविले

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** सिंदेवाही परिक्षेत्र (ब्रह्मपुरी प्रादेशिक वनविभाग) येथील 'ऊ२' नामांकित वाघिणीच्या शावकासंदर्भात काही वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली माहिती वस्तुस्थितीला धरून नसून दिशाभूल करणारी आहे. या चुकीच्या बातम्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये अनावश्यक भीतीचे आणि वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत गैरसमजाचे वातावरण निर्माण होत असल्याचे वन विभागाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

याबाबतची खरी वस्तुस्थिती अशी की, सिंदेवाही परिक्षेत्रातील 'ऊ२' वाघीण मानव-वन्यजीव संघर्ष निर्माण करत असल्यामुळे, वन विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून तिला तिच्या शावकांसह सुरक्षितपणे पकडले आहे. मात्र, वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याप्रमाणे 'ऊ२' वाघिणीला परतवाडा येथे हलवलेले नसून, तिच्या शावकांपैकी एका शावकाला (ऊ२ ण्लं १) पुढील आवश्यक व्यवस्थापन, सुरक्षितता आणि वैद्यकीय देखरेखीच्या दृष्टीने परतवाडा ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. या शावकाला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सोडण्यात येणार असल्याच्या अफवा देखील पसरत आहेत, परंतु सद्यस्थितीत या 'ऊ२ ण्लं १' शावकास मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये सोडण्याचा किंवा मुक्त अधिवासात पुनर्स्थापित करण्याचा कोणताही निर्णय अथवा योजना वन विभागाच्या विचाराधीन नाही. शावकाला केवळ सुरक्षित वातावरणात वैद्यकीय देखरेख आणि आवश्यक निगा उपलब्ध करून देणे हाच या स्थलांतराचा प्रमुख उद्देश आहे. प्रसारमाध्यमांनी नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही यासाठी वस्तुस्थितीवर आधारित आणि वन विभागाकडून पडताळणी केलेली अचूक माहिती प्रसारित करावी, असे आवाहन वन विभागातर्फे करण्यात आले आहे.

## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तिवसा :** तळेगाव येथील २० वर्षीय मेंढपाळ युवकाने ३ जून रोजी सकाळी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून परिसरात शोककळा पसरली आहे. कृष्णा नाथाजी कोरटकर (२०) रा. तळेगाव ठाकूर असे मृत युवकाचे नाव आहे. कृष्णा हा बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे मेंढ्या चारण्यासाठी गेला होता. त्यानंतर सकाळी सुमारे ९ वाजताच्या दरम्यान तो घरातील नळाचे पाणी भरण्यासाठी घरी आला. यावेळी घरातील मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असलेल्या भावाला एका खोलीत ठेवून त्याने घरातील इतर दरवाजे आतून बंद केले. दरम्यान, मोठा भाऊ रमेश कोरटकर घरी आल्यानंतर घराबाहेर कृष्णाच्या चपला दिसल्याः मात्र दरवाजा आतून बंद असल्याने त्यांना संशय आला. त्यांनी शेजाऱ्यांना बोलावून दरवाजा तोडला असता कृष्णा हा घरातील खोलीत दोरीच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती तत्काळ तिवसा पोलिसांना देण्यात आली. ठाणेदार गोपाल उपाध्याय यांनी हेकॉ रवींद्र लांजेवार, मेहरे यांना तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी तिवसा ग्रामीण रुग्णालयात पाठविला. कृष्णा कोरटकर याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही.

## महाविद्यालये व प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांवर सहसंचालक उच्च शिक्षण यांच्याशी चर्चा

◆ शैक्षिक महासंघाच्या अनेक वर्षांच्या मागणीची पूर्तता; कालमर्यादित प्रकरण निपटाऱ्यासाठी नागरिकांची सनद जाहीर ◆ सहसंचालकांचे शैक्षिक महासंघाकडून अभिनंदन

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती:** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनात तसेच विभागीय महामंत्री प्रा. डॉ. मंगेश अडगोकर यांच्या नेतृत्वात महासंघाच्या शिष्टमंडळाने मा. डॉ. अभय खांबोरकर, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांची भेट घेऊन महाविद्यालये व प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली. बैठकीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक व विधायक चर्चा झाली असून संबंधित प्रश्नांच्या निराकरणासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे. आश्वासन सहसंचालकांनी दिले.

सत्र २०२६-२७ लवकरच सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्ती प्रक्रियेला तातडीने सुरुवात करण्याची महासंघाने मागणी केली. नियमित पदभरती प्रक्रिया सुरू असली तरी ती पूर्ण होईपर्यंत अध्यापन कार्य सुरळीत सुरू ठेवण्यासाठी तासिका तत्त्वावरील अध्यापकांची आवश्यकता असल्याचे महासंघाने निदर्शनास आणून दिले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया त्वरित सुरू करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी मा. सहसंचालकांनी दिली.

महासंघाने यापूर्वी दिलेल्या स्मरणपत्राच्या माध्यमातून प्राध्यापकांच्या प्रलंबित स्थाननिश्चिती, पदोन्नती, वेतननिश्चिती व पुनर्निर्धारण प्रकरणांचा प्रश्न उपस्थित केला. विशेषतः एम.फिल. पात्रताधारक सेवानिवृत्त व दिवंगत प्राध्यापकांच्या स्थाननिश्चिती, पदोन्नती (सीएएस) व अनुषंगिक लाभांची अनेक प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली. कार्यरत प्राध्यापकांना लाभ मंजूर झाल्यानंतरही सेवानिवृत्त व दिवंगत प्राध्यापकांच्या प्रकरणांवर निर्णय न होणे अन्यायकारक असल्याचे महासंघाने नमूद केले. या संदर्भात शासन स्तरावरून तातडीने मार्गदर्शन घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन सहसंचालकांनी दिले.



अनुदानित महाविद्यालयांतील रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. अनेक महाविद्यालयांच्या पदनिर्धारणामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याची बाब महासंघाने निदर्शनास आणून दिली. पदनिर्धारणातील त्रुटी वेळेत दुरुस्त न झाल्यास काही विषयांना अन्याय होण्याची तसेच महाविद्यालयांच्या शैक्षणिक गरजा अपूर्ण राहण्याची शक्यता असल्याचे महासंघाने स्पष्ट केले. संपूर्ण भरती प्रक्रिया संपूर्ण भरती प्रक्रिया निश्चित कालबद्ध वेळापत्रकानुसार राबविण्याचा आग्रह यावेळी धरण्यात आला. यावर शासनाने विकसित केलेल्या विशेष पोर्टलच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येणार असून ती अत्यंत पारदर्शक व तंत्रज्ञानाधिष्ठित असेल, अशी माहिती सहसंचालकांनी दिली.

बैठकीत सहसंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळाच्या अद्ययावतीकरणाचा विषयही उपस्थित करण्यात आला. विभागीय संकेतस्थळावर जीपीएफ, डीसीपीएफ/एनपीएस संदर्भातील अद्ययावत माहिती, शासन निर्णय, परिपत्रके, कार्यालयीन आदेश व सूचना नियमितपणे उपलब्ध करून देण्याची मागणी महासंघाने केली. यावर सहसंचालक कार्यालयाने नवीन संकेतस्थळ विकसित केले असून त्यावर आवश्यक सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिल्या जातील, असे सांगण्यात आले.

यावेळी महासंघाने सहसंचालक कार्यालयाने जाहीर केलेल्या नागरिकांच्या सनदेचे विशेष स्वागत केले. विविध प्रकारच्या प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करून पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकाभिमुख प्रशासनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याबद्दल महासंघाने मा. सहसंचालकांचे अभिनंदन केले. विशेष म्हणजे, नागरिकांची सनद जाहीर करण्याबाबत महासंघ सातत्याने पाठपुरावा केल्याचे फलित प्राप्त झाल्याचा आनंद व्यक्त करण्यात आला.

याबाबत बोलताना सहसंचालकांनी सांगितले की, अल्पावधीतच कार्यालयाचे संपूर्ण कामकाज ई-ऑफिस प्रणालीद्वारे करण्यात येणार असून महाविद्यालयांना त्यांच्या स्वतंत्र लॉग-इनद्वारे विविध प्रस्ताव सादर करता येतील. तसेच प्रत्येक प्रकरणाची अद्ययावत स्थिती ऑनलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे कामकाजात अधिक पारदर्शकता, गतिमानता आणि उत्तरदायित्व निर्माण होईल. महासंघाच्या शिष्टमंडळाने या उपक्रमाचे स्वागत करून सहसंचालक कार्यालयाचे अभिनंदन व आभार व्यक्त केले.

या बैठकीस कार्यालयाचे प्रशासकीय अधिकारी मा. डॉ. प्रभू दवणे उपस्थित होते. महासंघाच्या वतीने विभागीय कोषाध्यक्ष प्रा. डॉ. दिनेश खेडकर, विभागीय महिला प्रमुख प्रा. डॉ. रेखा मग्गीरवार, अमरावती शहराध्यक्ष प्रा. डॉ. ओमप्रकाश मुंदे, अधिष्ठाता प्राचार्य डॉ. एच. आर. देशमुख, प्राचार्य डॉ. दिनेश निचत, प्रा. डॉ. अनुप शर्मा, प्राचार्य डॉ. उदय मांजरे, तसेच विविध महाविद्यालयांतील तासिका तत्त्वावरील प्राध्यापक उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क -** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A2977, RRC Helpline No. 8484842135